<u>दिनांक १६.१०.२०२५ रोजी</u> –

**अभियोग पक्षाचा सा.क्र.१ श्री. तेजस दिपक कुलकर्णी यांची शपथेवर उलटतपासणी सुरु, आरोपी क्र.२ व ३ तर्फे मा. वकील श्री. राठी यांच्या वैयक्तीक कारणांवरुन मुदत मागितली ती मुदत उलटतपास घेण्यासाठी मंजुर करण्यात आली. सदरील खटलयामधील सर्व आरोपींवर ठेवण्यात आलेला आरोप हा वेगवेगळ्या स्वरुपातील असल्यामुळे प्रत्येकाचा बचाव हा वेगळा आहे. अशा परिस्थीतीत पुढील आरोपी क्र.४ तर्फे विद्वान श्री. पाटील पी.पी. यांनी अभियोग साक्षीदार क्र.१ चा उलटतपास घेण्यास होकार दिला त्यावरुन,**

**<u>आरोपी क्र.४ तर्फे मा. वकील श्री. पाटील पी.पी. यांच्यातर्फे उलटतपास शपथेवर सुरु –</u>**

८१. हे म्हणणे खरे आहे की, अर्पिता सुनिल वाडकर या विभागीय क्रिडा संकुल येथे कधीही कंत्राटी अथवा कायमस्वरुपी कर्मचारी म्हणुन कामाला नव्हत्या. हे म्हणणे खरे आहे की, जी व्यक्ती विभागीय क्रिडा संकुल समितीमध्ये कामालाच नाही त्यांना समितीसाठी किती निधी आला अथवा किती निधी आहे याची माहिती नसते. हे म्हणणे खरे आहे की, अर्पिता वाडकर यांचा वैयक्तीक अथवा कोणत्याही स्वरुपाचा संबंध विभागीय क्रिडा संकुल समिती औरंगाबाद यांच्याशी नाही. हे म्हणणे खरे आहे की, जी व्यक्ती विभागीय क्रिडा संकुल समिती औरंगाबाद येथे कामालाच नाही त्या व्यक्तीला तेथील निधी कोण काढु शकतो याची माहितीच नसते. हे म्हणणे खरे आहे की, मी अर्पिता सुनिल वाडकर यांच्याविरुध्द फिर्याद दिलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, अर्पिता सुनिल वाडकर यांचा विभागीय क्रिडा संकुल समितीचे खाते पाहण्याचा व हाताळण्याचा कोणताही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासतील संपुर्ण मजकुर मी खोटा नमुद केलेला आहे.

**<u>उलटतपास आरोपी क्र.४ करिता संपला</u>.**

<u>समक्ष</u>

RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR
Digitally signed by RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR
Date: 2025.10.16 13:19:14 +0530

**( श्री. आर. एस. जांबोटकर )**
मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद
**दिनांक – १६/१०/२०२५**

<u>श्रवणोत्तर स्वीकृती.</u>

RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR
Digitally signed by RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR
Date: 2025.10.16 13:19:19 +0530

**( श्री. आर. एस. जांबोटकर )**
मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद

आर.सी.सी क्र. ७९०/२०२५
निशाणी क्र.५५/ क लगत

दिनांक १६.१०.२०२५ रोजी –

उलटतपासणी आरोपी पक्ष क्र.५,६,७ करीता विद्वान श्री. चव्हाण एस.आर. विधीज्ञ गैरहजर व त्यांचे सहकारी विधिज्ञ श्री. ए. यु. उबाळे यांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

उलटतपासणी आरोपी क्र.८ व ९ करीता विद्वान श्रीमती मालोदे एस.पी., विधीज्ञ हजर, परंतु त्यांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

उलटतपासणी आरोपी क्र.१० व ११ करीता विद्वान श्री. घाणेकर एन.एस/ एम. बी. दळवी हजर, परंतु त्यांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

समक्ष

RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR
Digitally signed by RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR
Date: 2025.10.16 13:19:25 +0530

( श्री. आर. एस. जांबोटकर )
मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद
दिनांक – १६/१०/२०२५

श्रवणोत्तर स्वीकृती.

RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR
Digitally signed by RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR
Date: 2025.10.16 13:19:31 +0530

( श्री. आर. एस. जांबोटकर )
मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद